# ज्ञानार्थी समाजाचा ग्रंथालयाशी सहसबंध

**प्रा. दिलीप दादाजी विरुटकर (ग्रंथपाल )**
चिंतामणी महाविद्यालय
पोभूर्णा तह-पोभूर्णा जि-चंद्रपूर
email - ddvirutkar17@gmail.com

---

**सारांश :** समर्थ रामदासांनीज्ञानार्जनाची प्रक्रिया सोप्या शब्दामध्ये सूत्रबद्ध केली आहे.विचाराच्या आदानप्रदानातून ज्ञानार्जन घडत असते. ते विचारांचे आदानप्रदान संवादाच्या माध्यमातून होते. आपल्या संवादाचे माध्यम आणि अभिव्यक्त होण्याचेसाधन म्हणचेच भाषा ऐकणे आणि बोलणे यांच्यासोबतच वाचन आणि लेखन हि देखील संवादाची प्रभावी माध्यमे आहेत. वाचन हे मानसाला मानसिक व भौतिक अशा दोन्ही पातळीवर समृद्धी देत असते.

अगदी प्राचीन काळी मानव अन्न, वस्त्र, निवारा याप्रमुख गरजा भागविन्यातच समाधान मानीत असे. पुढे त्याची जसजशी प्रगती होत गेली आणि तो लिहायला वाचायला शिकला, तेव्हा तो आपले विचार, आपले ज्ञान पुढील पिढ्यासाठी ताम्रपर, शिलालेख, भूर्जपत्रे आणि नंतर कागद अशा साधनांचा उपयोग करून, हस्तलीखीतातून अक्षरबद्ध करू लागला. हि हस्तलिखिते संग्रहित करून पुढील पिढ्यांसाठी उपलब्ध ताम्रपर, शिलालेख, भूर्जपत्रे आणि नंतर कागद अशा साधनांचा उपयोग करून पिढ्यांसाठी उपलब्ध करून देण्याच्या हेतूने जी संस्था अस्तित्वात आली, तिलाच पुढे ग्रंथालय हि संस्था प्राप्त झाली.

माहितीतंत्रज्ञान युगात फेसबुक, इनस्टाग्राम, ट्विटर, व्हाटसअप या माध्यमांची माहिती संप्रेषित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात उपयोग होऊ लागला आहे. या वेगवेगळ्या साधनांच्या माध्यमातून माहितीचे आदान-प्रदान करून अत्यंत आवश्यक झाले आहे हि साधने वापरणे जसे आवश्यक झाले तसे त्याचे दुष्परिणामहीजानवतात . म्हणून ग्रंथालये ही सत्तातरीतज्ञाननिर्मिती उल्लेखनीय कार्यामुळे त्याना कमालीचे महत्वप्राप्त होते . या समाजात ग्रंथालयामुळे समाज हा जिज्ञासू व ज्ञानार्थी बनलेला आहे . ग्रंथालयामुळे वाचनाची लोकांची आवड वाढलेली आहे . त्यामुळे विचार कौशल्ये व क्षमता वाढल्या आहेत .

**बिजशब्द–**ग्रंथालय, समाज, सांस्कृतिक, ज्ञान

.........................................................................................................................................................

**प्रस्तावना : –**

माहिती समाज हा एक समाज आहे जिथे माहितीचा वापर, निर्मिती, वितरण हाताळणी आणि एकत्रीकरण ही एक महत्वपूर्ण क्रिया आहे . माहिती दळणवळण तंत्रज्ञान हे त्याचे मुख्य चालक आहेत, ज्यामुळे विविधतेत जलद माहितीची वाढ झालेली आहे आणि शिक्षण, अर्थव्यवस्था, आरोग्य सरकार, युद्ध आणि स्तर यासह सामाजिक संघटनेच्या सर्व पैलुमधे बदल होत आहेत . जे लोक या स्वरूपाच्या समाजात भाग घेण्यास सक्षम आहेत त्यांना कधीकधी एकतर संगणक वापरकर्ते किंवा अगदी डिजिटल नागरिक म्हटले जाते . ज्याची व्याख्या के मॉसबर्गर यांनी जे नियमितपणे आणि प्रभावीपणे इंटरनेट संज्ञापैकी एक आहे जे मानव समाजाच्या एका नवीन आणि वेगळ्या टप्प्यात प्रवेश करत आहेतहे सूचित करण्यासाठी ओळखले गेले आहे .

सर्वप्रथम १९७३ साली डॅनीअल बेल यांनी 'माहिती समाज' ही संकल्पना चा 'The Coming of post Industrial society'या ग्रंथात मांडली. ज्ञानावर आधारित सेवा किंवा तात्विक ज्ञान हा दोन पैलूवर नवीन अर्थव्यवस्थेची मध्यवर्ती संरचना आणि माहितीपर समाज अशी मांडणी केली. १९९० च्या दशकात वर्ल्डवाईड वेब आणि आय.सी.टी चाविकास झाला. माहितीचा समाज ही संकल्पनाशासकीय व ताविक विचारसरणीवर बांधणीहोत असतांना तिचा मुख्य हेतू जागतिक बँक या बहुविध संस्थाच्या माध्यमातूनजगातील गरीब आणि श्रीमंत अशी दरी निर्माण होऊण विकसित राष्ट्रानी तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा विकास धोरणाचा अवलंब करुन केल्याने दळणवळण उद्योग शेअर बाजारावर आला. पंरतू उत्तरेकडील बाजार थाबण्यास सुरवात झाली.

**ज्ञानधिष्टित समाजनिर्मीतीची आवश्यकता :–**

नृसिहवाडी : गावोगावी स्पर्धा परीक्षा केन्द्रांची निर्मीती ही बदलत्या काळाची गरज आहे. स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थांनी उद्दिष्ट निश्चित ठरवून सातत्यपूर्ण प्रयत्नकेल्यास देशालागवसणी घालता येते. ज्ञानाधिष्टित समाजनिर्मितीसाठी चांगले अधिकारी तयार झाले पाहिजेत. आपल्या कृतीतून त्यांनी समाजसेवेचा वसा सिद्ध केलापाहिजे. अशोक पुजारी यांनी स्पर्धा परिक्षा केंद्राच्या माध्यमातून सामाजिक सेवाअविरतपणे चालू ठेवावी. असे प्रतिपादन सकाळ चे निवासी संपादक निखिल पंडितराव यांनी केले. येथे अशोक पुजारी स्पर्धा परीक्षा केन्द्राच्या उद्घाटन समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. श्री. पंडितराव म्हणाले, "ज्ञानाबरोबर संस्काराची अंत्यंत गरज आहे. ज्ञान आणि संस्कारामुळे चांगल्या समाजाची निर्मिती होते. वेळ आणि विश्वास या गोष्टी आयुष्यभर प्रत्येकाने जीवनात जपल्या पाहिजे या दोन्ही एकदा गेल्याकी परत येऊ शकत नाहीत. आपण जे काही ठरवतो त्यासाठी सराव चुकीचा असल्यास आपल्याला अपयशयेण्याचीशक्यताअधिक आहे. त्यामुळेसतत परिश्रम करत राहणे अत्यावश्यकआहे".

**राष्ट्र विकासामध्ये ग्रंथालयाची भूमिका-**

मानवाचाविकास यात्रे विषयी नोबल पुरस्कार विजेते जोसेफ स्टिगलीटज यांनी त्यांच्या "क्रिएटिंग एलगिन सोसायटी या ग्रंथात असे म्हटले आहे की,कोणत्याही देशाचा विकास हा त्यामध्ये भांडवली गुंतवणूक किती प्रमाणत होते यावर अवलंबून नसून त्या देशातील लोकांची, समाजाची शिक्षणाची आणि ज्ञान घेण्याची किती जिज्ञासा आहे क्षमता आहे आणि ती कशी आहे यावर अवलंबून असते. तंत्रज्ञान शोध आणि माहिती आधारित अर्थव्यवस्था निर्माण होत असून त्यामध्ये ग्रंथालय महत्वपूर्ण भूमिका घेऊन राष्ट्र विकासाची समृद्ध वाटचाल तयार करू शकते. भारत हे वाचनसंस्कृती आणि साहित्यपरंपरा लाभलेले राष्ट्र आहे. राष्ट्र विकासातील समृद्ध वाटचालीत ग्रंथालय महत्वपूर्ण सहयोग देत आहेत. राष्ट्राच्या शैक्षणिक राजकीय, सामाजिक, आर्थिक, वैज्ञानिक अशा सर्वच क्षेत्रात ग्रंथालय समृद्ध होत आहे.

**ग्रंथालयाचे सांस्कृतिकचळवळीचे केंद्र-**

कौशल्य आत्मसात करण्यासाठी वाचनाची आवड असल्यास त्याची पूर्तता ग्रंथालय करू शकते. ग्रंथालयात असण्याऱ्या विविध पुस्तकाचा उपयोग तसेच वर्तमानपत्र, मासिके, स्पर्धा युगासाठी वेगवेगळे स्पर्धा पुस्तके अशा प्रकारे या पुस्तकामुळे आपण ज्ञान अर्जन करू शकते. तसेच या पुस्तकाव्दारे आपल्याला संस्कृती कळते. आणि ह्या संस्कृतीने आपण समाज हा एक होतो. समाजाची वैचारिक पातळी व संस्कृतीचे देवाण-घेवाण या यामुळे आपली वैचारीक पातळीवाळते.

यासाठी पुरवठा करणारे म्हणजे वाचनालायप्रत्येक वार्ड मध्ये एक छोटस वाचनालय असायला हवे जसे प्रत्येक वार्डात गार्डन असते त्याचप्रमाणे ग्रंथालय सुद्धा असायला हवे त्यामुळे जे व्यक्ती पैसे खर्च करण्याची परिस्थिती नसेल त्या व्यक्तींना त्याचा फायदा झाला तर पुन्हा जी पीडी सतत मोबाईल वर वेळ घालवत असते त्यांना वडवण्यास हातभारलागेल .

समाजाला जोडणारा दुवाम्हणजे ग्रंथालय होय . यामुळे समाजातील घडामोडी तसेच संस्कृती जतन वैचारीक पातळी वाढविण्यास ग्रंथालय उपयोगी पडू शकते .

समाजात वाचनसंस्कृतीरुजविण्यातग्रंथालयाची मोलाची भूमीका आहे . ग्रंथालयाच्या माध्यमातून विविध देश, प्रांत , संस्कृती आणि समाजातील नव नविन विचार वाचकापर्यंत पोहचविले जातात . ग्रंथालय ही केवळ एक ग्रंथ उपलब्ध करूनदेणारीइमारत नसते, तर ते सांस्कृतिक चळवळीचे केन्द्र असते . राज्यातील अनेक ग्रंथालयांनी आपल्या कार्यातून हे सिद्ध केले आहे . नव्या युगातील ज्ञानाधारीत व्यवस्थेत ज्ञानवान आणि तेवढाचसुजाण नागरिक पोहोचविव्यासच तोस्पर्धेला सक्षमपणे समोर जाऊ शकेल . नव्यापिढीपर्यंत ग्रंथालयाच्या माध्यमातून ज्ञानगंगा पोहोचविण्यास हे शक्य आहे . ग्रंथाच्या माध्यमातून त्यांच्यातनव्या जाणिवा, आकांक्षा आणिप्रेरणानिर्माण करणे गरजेच आहे . डॉ . कलाम यांनी म्हटल्याप्रमाणे "मुलांचे संगोपन ज्ञानपुरकवातावरणात करणे आवश्यक आहेठ तसे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारीसर्वांची आहे" .

**निष्कर्ष**

१ ) ग्रंथालयामुळे समाज व संस्कृती एकत्रआणता येते .

२ ) ग्रंथालयामुळे समाजाची उन्नती होवूशकते .

३ )ग्रंथालयामुळे ज्ञानात भर पडते व जगण्याचा नवीन आनंद घेता येतो .

**संदर्भ**

१. टॉफलर आलीनपॉवर शिफ्टए नॉलेज वेल्थ एन्डव्हायोलन्स एट द एज ऑफ २१ सैन्ट्री, बैटन बुक्स १९ .
२. ग्रंथालयशास्त्राची रूपरेषा – ल . व फाडके, आराध्य पब्लिकेशन पुणे .
३. ज्ञान गंगोत्री, डिसेंबर – मे, २०१२ – २०१३, पान नं . २२
४. http://www.niscair.res.in.in
५. http://www.ugc. ac in /new. initiativesinfoncce /html
६. http://www.emeraldsight.com